# पोटनिवडणुकीत पाच अर्ज दाखल

## चौफाळा-मदिनानगर प्रभाग। उमेदवारीसाठी उरले दोन दिवस

लोकमत न्यूज नेटवर्क

**नांदेड :** महापालिकेच्या प्रभाग १३ ड चौफाळा-मदीनानगरसाठी होणाऱ्या पोटनिवडणुकीत आतापर्यंत चार उमेदवारांनी पाच नामनिर्देशनपत्र दाखल केले आहेत. या निवडणुकीत प्रमुख पक्षांनी आपले उमेदवार अद्यापही निश्चित केले नाहीत.

चौफाळा-मदीनानगर प्रभागासाठी पोटनिवडणूक कार्यक्रम घोषित करण्यात आला आहे. प्रभागाचे



नगरसेवक साबेर चाऊस यांनी राजीनामा दिल्याने ही निवडणूक घेण्यात येणार आहे.

उमेदवारी अर्ज भरण्याच्या पहिल्या दिवशी म्हणजे १४ जानेवारी रोजी एक अर्ज, १५ जानेवारी रोजी दोन अर्ज दाखल झाले. तर १६ आणि १७ जानेवारी रोजी एकही अर्ज दाखल झाला नाही. १८ जानेवारी रोजी दोन उमेदवारांनी अर्ज दाखल केले आहेत.

या प्रभागात काँग्रेससह भाजपा, एमआयएमसह अन्य पक्षांचे उमेदवार रिंगणात उतरतील अशी परिस्थिती आहे. पण उमेदवारी भरण्याच्या शेवटच्या दोन दिवसापर्यंत पक्षांनी आपले उमेदवार निश्चित केले नव्हते. सोमवारी ते निश्चित होतील, अशी अपेक्षा आहे.

